नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 10/09/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

## जबरी चोरी

पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील शिवमंदीर दत्तनगर चनकापुर येथे दिनांक 08/09/2021 चे 23.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- रमेश मंगुजी दापुरकर वय 61 वर्ष, रा. चनकापुर, वार्ड नं 3, क्वॉर्टर नं 5/1, ता. सावनेर हे एकटेच दहेगाव येथुन ओमनंगर येथे राहणाऱ्या पुतणीच्या घरी जेवण करण्याकरीता आपल्या होंडा शाईन गाडी क्र एम.एच.40/बी.एस.7020 ने जात असता आरोपी क्र. 1. अनिल शिवशंकर वर्मा, वय 19 वर्ष व 2 विधीसंघर्षग्रस्त बालक व 1 आरोपी फरार सर्व रा. चनकापूर यांनी घटनास्थळी फिर्यादीच्या गाडीला आडवे होवुन त्या पैकी आ. क्र 3 ने गाडीस लाथ मारून गाडीसह त्यांना खाली पाडले. त्यामुळे ते किरकोळ जखमी झाले व आ. क्र 1 याने फिर्यादीस तलवारीचा धाक धाकवुन आरोपी क्र 4 याने फिर्यादीचे हात पकडुन ठेवले व आरोपी क्र. 2 याने फिर्यादीचे खिशातील नगदी 5,000/-रू. व नोकीया कंपनीचा मोबाईल किंमती 1,000/-रू. असा एकुण 6,000/-रू चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन पळुन गेले. आरोपी हे फिर्यादीचे मोहल्यात राहत असुन फिर्यादी त्यांना नावाने ओळखतो.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 394, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र 1 ला अटक करण्यात आली असून दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री धोपाडे हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कन्हान :- अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील सत्रापुर कन्हान येथे दिनांक 09/09/2021 चे 16.13 वा. दरम्यान फिर्यादी नामे- सौ वैशाली विरेंद्र मेश्राम वय 30 वर्ष रा. सत्रापुर कन्हान यांचे घरी जनरल स्टोर चे दुकान असुन त्या 5 मिनिटाकरीता दुकान उघडुन घरात चहा करण्याकरीता गेल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने जनरल स्टोर च्या खुल्या लॉकर च्या आत पर्स मध्ये 24 ग्रॅम सोन्याचे मंगलसुत्र किं. 70,000/-रू. व 3,000/-रू. कॅश असे एकुण 73,000/-रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राहुल रंगारी मोन. 9834087136 हे करीत आहे.

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कुही :- अंतर्गत 25 कि.मी अंतरावर मौजा उटी शिवार येथे दिनांक 09/09/2021 चे 19.00 वा. ते दिनांक 10/09/2021 चे 09.00 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने अनोळखी पुरूष वय अंदाजे 35 ते 40 वर्षे यास अज्ञात कारणावरून कोणत्यातरी हत्याराने डोळयाच्या मागच्या बाजुस व चेहऱ्यावर मारून जिवानिशी ठार करण्याच्या उद्‌देशाने गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी नामे- जगनजी आत्राम, वय 51 वर्षे, रा. उटी. पोस्ट. चांपा, ता. उमरेड जि.नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 307 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध

घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. बाबुराव राऊत मो. क्र. 7020753909 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 13 कि.मी. अंतरावरील उडाणपुल वर एनएच 47 रोडवर पाटणसावंगी शिवार येथे दिनांक 09/09/2021 चे 01:45 वा. दरम्यान फिर्यादीचा भाऊ नामे– रविंद्र चंद्रभान भागवतकर( मृतक ) वय 35 वर्ष व त्याचा मित्र श्याम भोवते हे ऍक्टीवा गाडी क्र.एम एच–40/बीएन– 4052 ने दोघेही कोराडी वरून सावनेर कडे जात असता अज्ञात वाहन चालक आरोपीने आपले वाहन भरधाव वेगान निष्काळजीपणे चालवुन ऍक्टीवा गाडीला जबर धडक दिली. या अपघातात फिर्यादीचे भावाचा मृत्यु झाला तर त्याचा मित्र हा जखमी आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेंद्र चंद्रभान भागवतकर वय 44 वर्ष रा.वार्ड क्र. 2 रमाई नगर, कोराडी ता. कामठी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि निशांत फुलेकर पो.स्टे.सावनेर मो.नं.7588564300हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर